# प्रकरण पहिले

# ताराबाई शिंदे यांचे व्यक्तिमत्व

# प्रकरण पहिले

## ताराबाई शिंदे यांचे व्यक्तिमत्व

### १.१ व्यक्तिमत्व :

एकोणिसावे शतक हे एक लक्षणीय शतक आहे. दोन समर्थ पण अतिशय भिन्न अशा संस्कृतींची टक्कर ह्या शतकात भारताच्या भूमीवर झाली. त्यामुळे भारतीय समाजजीवन घुसळून निघाले. ह्या घुसळणीतून अनेक नवीन विचार नवीन पंथ नवीन मूल्यकल्पना जन्माला आल्या, तशीच अनेक मोठी माणसे जन्माला आली. म्हणूनच या शतकाला नव्या शक्तीच्या उपासनेचे शतक म्हटले जाते. मराठी वाङ्.मयाला लेखकांच्या स्वरूपात अनमोल रत्न निर्माण झाली. त्या रत्नामध्ये लेखक व स्त्रीलेखिका यांचाही समावेश आहे. त्यापैकी ताराबाई शिंदे या एक स्त्री लेखिका होय.

ताराबाई शिंदे यांचा जन्मकाळ साधारणत: एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध मानला जातो. इ.स. १८५० ते १९१० असा ताराबाईंचा जीवनकाल मालशे यानी सुचविला आणि समग्र फुले वाङ्.मयाची चौथी आवृत्ती संपादित करणाऱ्या य.दि. फडके यांच्यासह सर्वांनी तो स्वीकारला. ढोबळ मानाने हा काल तर्कसंगत म्हणता येतो. मे, १८८१ मध्ये विजयालक्ष्मी खटला झाला. त्यानंतर मे, जून व जुलै महिन्यात त्यावर प्रचंड वृत्तपत्रीय चर्चा झाली. नोव्हेंबर, डिसेंबर, १८८१ मध्ये ताराबाईंनी लेखन केले व १८८२ च्या सुरवातीस ते प्रकाशित झाले. १९०५ पर्यंत ताराबाई निश्चित होत्या असा पुरावा आहे. [१]

"ताराबाईंच्या वडिलांचे नांव बापूजी हरी शिंदे. हे शिंदे घराणे वऱ्हाडातले बुलढाण्यातले अस्सल मऱ्हाटमोळा घराणे. घरची परिस्थिती सधन म्हणावी अशी. बुलढाण्यातील चार प्रसिध्द वाड्यापैकी एक वाडा ताराबाईंच्या वडिलांचा होता. इतर तीन

सधन ब्राह्मणांचे होते. कदाचित ह्या ब्राह्मणांशी समान असलेल्या प्रतिष्ठेमुळे ताराबाईंवर पडदानशील मराठी संस्कार जरा विरळ झाले असावेत."[२]

ताराबाईंची प्रतिमा ठेंगणी, ढुसकी चष्मा लावत असत. स्वभावाने तेज रागीटच म्हणाव्यात. त्यामुळे अवतीभवतीची लहान मुले त्यांना भीत असत. त्यांच्या स्वभावातील हा उग्रपणा त्यांच्या लेखनातपण जाणवतो.[३]

ताराबाईंना खरे तर लग्नच करावयाचे नव्हते. पण वडिल सुधारक असले तरी जनरीत व जमाना डावलता येत नाही, त्यामुळे त्यांनी मधला मार्ग शोधला. आपण आपल्या मुलीला ज्या लाडात व स्वातंत्र्यात वाढवली ते दुसऱ्या घरी गेल्यावर मिळणार नाही, म्हणून त्यांनी लेकीचे लग्न केले खरे पण जावई घरी आणला. असा घरजावई होण्यास सामान्यतः गरिबाघरचा व कमी कर्तृत्वाचाच मुलगा तयार होणे शक्य असल्यामुळे म्हणा वा अन्य काही कारणामुळे म्हणा त्यांना संसारसुख लाभले नाही. मुलपण झाले नाही. एकूण वैवाहिक जीवनाचा खेळखंडोबा झाला. म्हणून ताराबाई आपल्या पुस्तकात म्हणतात,

" कित्येक श्रीमंत गृहस्थ आपल्या लाडक्या लेकीचे लाडाकरिता व आवडीकरिता एखादे गरिबाचे मुलाबरोबर लग्न करून ते आपल्या जवळ बाळगतात. पुढे जोपर्यंत ती उभयता अज्ञान व असमंजस असतात तोपर्यंत बरे चालते. एकदा जर चांगले समजू लागले म्हणजे ही बया श्रीमंताची, ऐषआरामात वाढलेली, चतुर, हुशार नि बाबा म्हणजे जन्मकरंट्याचे ........ त्या ऐश्वर्याची वागणूक याना कोठून येणार ? हे जन्म दरिद्री, ताकाबरोबर शेवया खाणार. कुलटीन गाढवाला रोज दोनवेळ खसरा करून व दहाशेर दाणा

देवून वर कलाबूत जीन कलगी गेंदजोडी घालून जरी समजविले तरी ते खानदान, रोडक्या व अगदी शरपंजरी पडलेल्या घोड्याची बरोबरी करील काय ? तेव्हा तिला तो न आवडून ते केवळ शालजोडीला रगट्याचे ठिगळ याप्रमाणे होवून पुढे जे प्रकार होणे ते होतात. ते येथे लिहून दाखविणे नको. रोज जे जे धिंडवडे होतात ते ते दृष्टीस पडतातच. तो बापाचा लाड तिला जन्मभर कामी येतो का नाही बरे ? तेच पहिल्याने योग्य वर योजून जर देते तर त्याना उभयताना आनंदात नांदताना पाहून किती सुख होते बरे." [५]

ताराबाईंचे वडिल बापूजी शिंदे प्रतिष्ठित जमिनदार मराठा कुटुंबातील, एक जबाबदार व्यक्ती होते. ते त्याकाळी डेप्युटी कमिशनरच्या कार्यालयात हेडक्लार्कच्या हुद्द्यावर नोकरीला होते. ताराबाई चार भावंडातील एकुलती एक बहीण. त्यामुळे वडिलांची लाडकी लेक म्हणून वाढलेली. ताराबाई लाडकी लेक तर होतीच पण त्याबरोबर त्यांना शिक्षणही उत्तमरित्या मिळाले होते. त्यांना संस्कृत इंग्रजी व मराठी भाषेचे उत्तम ज्ञान होते. ताराबाईंचे वडिल बापूजी हे महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाचे सभासद होते. त्यामुळे सहाजिकच घरचे वातावरणही सुशिक्षित तसेच तत्कालीन समस्यावर चर्चा, वृत्तपत्रवाचन यांना प्रवृत्त करणारे असणार असे वाटते. तसेच ताराबाईंना शिक्षणाबरोबर समाजातील घटनाबद्दल विचार करण्यास त्यावेळच्या वातावरणाची कल्पना स्त्रीला मिळत असलेली तुच्छतेची वागणूक, स्त्री-पुरुष असमानता, पुरुषांचे स्वामित्व व प्रभुत्व व स्त्री म्हणजे पुरुषाची दासी, विधवा स्त्रियांचे हाल हे प्रत्यक्ष पहावयास मिळाल्यामुळे त्यांच्या चिकित्सक बुध्दिला अधिकच वाव मिळत गेला असावा असे वाटते.

## १.२ ताराबाई शिंदेंचे व्यक्तिमत्व घडण्यात कारणीभूत परिस्थिती :

खऱ्या अर्थाने अव्वल इंग्रजी काळामध्ये मराठी वाङ्.मयाला एक वेगळी कलाटणी मिळाली आणि मराठी साहित्याचा चेहरा मोहरा बदलून गेला. काव्य, कथा, कादंबरी, निबंध, नाटक चरित्र असे विविध वाङ्.मय निर्माण झाले आणि या सर्वातून समाज जीवनाचे दर्शन घडू लागले. परिणामी स्त्री जीवनाचेही चित्रण यात प्रकर्षाने झाल्याचे जाणवते.

इंग्रजी आमदनीत हिन्दूस्थानात इंग्रजानी इतर सर्व क्षेत्राबरोबर शिक्षणक्षेत्र ही आपल्या ताब्यात घेऊन त्यामध्ये आमुलाग्र सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यानी अनेक आयोगाची स्थापना केली अनेक शिफारशी सादर केल्या. "The First Indian Education Commission of 1882" मध्ये Compulsory elementary Education Law त्यांनी पास करून घेतला व त्यामध्ये "Women Education" यावर Special Recommendations दिल्या.[६] काही खास स्त्री शिक्षण प्रवृत्त करण्यासाठी सोयी उपलब्ध करून दिल्या आणि याचा फायदा अनेक सुशिक्षित घराण्यातील मुलींनी स्त्रियानी करून घेतला आणि स्त्रिया शिक्षणाला पात्र ठराव्या हे जरी खरे असले तरी १९व्या शतकातील सामाजिक परिस्थिचा विचार केल्यास हिन्दू संस्कृतीतील स्त्रीला पुरूष प्रधान संस्कृतीचा नावाखाली दुय्यम स्थान दिले असल्याने स्त्री ही मागासच राहिली. तिला संस्कृतीच्या नावाखाली बंदिस्तच करण्यात आले. त्यांच्या विरूध्द आवाज उठविण्याचा प्रयत्न समाजसुधारकांनी केला. साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून केला पण बालविवाह, केशवपन विषमविवाह शिक्षणास विरोध अशा अन्यायी रूढींनी या काळातील स्त्रियांना शृंखलाबध्द केलेली आहे.

१८७४ नंतर गो.म. कुलकर्णी म्हणतात, "या नंतरच्या कालखंडातील विचार प्रवाह सर्वांगिण सुधारणावादाकडून आग्रमक राष्ट्रवादाकडे झुकत गेला. यातून चिपळूणकर, आगरकर, लो. टिळक, हरिभाऊ यासारखी नामवंत मंडळी तयार झली. इंग्रजी सत्तेच्या अनुषंगाने आलेली एतदेशीय समाजातील अभिमानशून्यता गुलामगिरी यांची जाणीव करून दिली. ही आत्मनाशाची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने विष्णूशास्त्री चिपळूनकरानी १८७४ पासून निबंधमाला सुरू केली. " शालापत्रक ",'केसरी', सत्यशोधक निबंधमाला यातून राजकीय, सामाजिक, सांस्कृति, शैक्षणिक व वाङ्.मयीन लेखन तत्कालीन लेखकानी केले" [७]

मुद्रणोत्तर काळात इ.स. १८८२ पर्यंत महत्वाचे वैचारिक लेखन करणाऱ्या स्त्रियात मिसेस फरार महात्मा ज्योतिराव फुले यांची मांग विद्यार्थिनी देखील आपल्या हातात लेखनी घेवून समाज प्रबोधनाचे कार्य करता करता तत्कालीन समाजस्थिती व समस्या मुलगा व मुलगी यांच्या संगोपनात केले जाणारे भेदाभेद मुलीना शिक्षण न देण्याची रूढी, सनातन रूढी समजूती व धार्मिक बंधने यामुळे स्त्रीवर घडत राहणारा अन्याय आणि स्त्री पुरुषात पक्षपात करणारी भारतीय वृत्ती यांची विशेष दखल मिसेस फरार यानी घेतली आणि अशी पक्षपाती वृत्ती योग्य नसल्याची जाणीव त्यांनी दिली आहे. " कुटुंबप्रवर्तननीती १८३५" हा अकरा प्रकरणाचा छपन्न प्रष्ठांचा त्यांचा ग्रंथ आधुनिक मराठीतील स्त्रीचा पहिला ग्रंथ म्हणून ओळखला जातो. [८] या ग्रंथात मिसेस फरार म्हणतात,

मुलीला शिकवू नये ह्याविषयी मोठा ह्या देशांत हटवाद चालला आहे. त्या अळवादाला आधार काय आहे ? मुलीनी लिहायला वाचायला शिकू नये असे कोणत्या तरी शास्त्रात सापडेल काय ? लोक बोलतात की, बायकाना शिकायची गरज नाही पण जिच्या स्वाधीन मुले लहानपणी असतात तिजपासून त्याला बऱ्यावाईट गुणांची तालीम प्रथम मिळती तिला शिकून शहाणी व्हायाची गरज नाही काय ? मुलाला प्रथम शिकवणारी जी ती अज्ञानी

राहून मुलाला कसे सज्ञान करील ? तर ह्यावरून लेकरास आईच्या ज्ञानाची अपेक्षा आहे असे उघड दिसते. कोणी म्हणतात की बायको शिकली तर नवऱ्याला अधिक मानून राहील असे खचित समजावे. ती ज्ञानी झाली असता आपल्या सदाचाराने नवऱ्याला सुख देण्यास किंवा संज्ञाच्या बंदोबस्ताने त्याची काळजी उणी करण्यास अधिक समर्थ होईल. पण अज्ञानापासून चांगले फल होतच नाही. बायकोच अज्ञानी ठेवून पुरूषाने आपले ज्ञान मिरवावे ह्यात काय थोरपणा ? त्यापेक्षा बायकोला शहाणे करून पुरूषानेही आपले शहाणपण वाढवावे हे फार चांगले.

" अहो स्वदेशहितकर्ते सुजनहो तुम्ही स्त्री जातीच्या शिक्षेस अनुकूल होवून ते काम ह्या देशात चालवा म्हणजे हा तुमच्या देशावर तुमचा मोठा उपकार होईल. तुम्ही म्हटले असता दीर्घदृष्टीने लोकांचे हित पहात असता आणि तुमच्या प्रत्यक्ष कन्येचे हित पाहत नाही हे तुम्हाला शोभेल काय ? मुलांवर तर तुमची प्रीती जडलीच आहे. परंतु त्यांतून मुलीवर प्रीती करायला थोडीशी तरी उरणार नाही की काय ? मुलीही तुमच्या पोटच्या आहेत आणि तुम्ही विचार करा की जसा मुलांचा आत्मा अमर तसा मुलींचाही अमर आहे. जसे मुलाला आपल्या बऱ्यावाईट आचरणाप्रमाणे इहलोकी परलोकी फळ मिळते तसे मुलीलाही मिळते म्हणून जितकी ज्ञानाची अपेक्षा पुत्राला आहे तितकीच कन्येला आहे." [१]

प्रबोधनाला सुरवात होत असतानाच मिसेस फरार यानी हे विचार मांडावेत आणि ते स्त्री सुधारणेच्या इतिहासाच्या अग्रस्थानी असावेत हे अर्थपूर्ण होय.

महात्मा जोतीराव फुले यांनाही मिसेस फरार (सिंधिया फरार) नावाच्या ख्रिश्चन महिलेकडून मुलींची शाळा तत्परतेने काढावयास प्रेरणा लाभली आणि त्यांनी खालीलप्रमाणे शाळा काढल्या.

१) १८४८ – भिडे वाडा, बुधवार पेठ, मुलींची १ली शाळा.

२) ३ जुलै, १८५१ बुधवार पेठ, मुलींची २री शाळा.

३) १५ मार्च, १८५२ वेताळ पेठ, मुलींची ३री शाळा.

ज्योतिरावांचे कार्य केवळ शाळा काढण्या/चालविण्यापुरते मर्यादित राहिले नव्हते, ते विचारवंत होते. ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करायचे या महत्वाकांक्षेने त्यांना झपाटले होते. त्यामुळे त्यांच्या निर्यांच्या बोलण्यात आणि शिकविण्यातही हे विचार येत असत. आणि या शिकविण्याचा परिणाम म्हणून जोतिरावांच्या शाळेतील एक मांग विद्यार्थिनी "मुक्ताबाई" हिने अवघ्या चौदाव्या वर्षी "मांग महाराच्या दु:खाविषयी निबंध" या नावाचा निबंध लिहिला आहे. तो पुढे १५ फेब्रुवारी, १८५५ आणि १ मार्च, १७५५ या "ज्ञानोदय" च्या अंकात दोन भागात छापून आला. तो असा –

मांग महाराच्या दु:खाविषयी निबंध पुणे येथील मांग महाराच्या शाळेतील एका मांग मुलीनी लिहिलेल्या निबंधात त्या मुलीने आपल्या आईबापाच्या मुखाने स्वजातीचे जे हालहवाल ऐकले त्याबद्दल तिला खरोखरंच कळवळा येवून तिने आपले ह्दय निर्भयपणे व निपक्षपणे दाखविले आहे. तत्कालीन महार मांगाची तीव्र दु:खाची अभिव्यक्ती करीत असताना आपल्या जमातीमधील स्त्रियांनाही कोणत्या प्रकारचे दु:ख सहन करावे लागत असत ते सांगितले आहे. ती म्हणते -

"पंडित तो तुमचे स्वार्थी आपलपोटे पांडित्य पूजेसहित एकीकडे गुंडाळून ठेवा आणि मी सांगते याजकडेच लक्षपूर्वक कान द्या. ज्या वेळेस आमच्यातल्या स्त्रिया बाळंत होतात त्यावेळेस त्यांच्या घरावर छप्परसुध्दा नसते. म्हणून लीव पाऊस वारा यांच्या उपद्रवामुळे त्यास किती दु:ख होत असेल बरे ! याचा विचार स्वत:च्या अनुभवावरून करा. जर

एखादेवेळेस त्यास बाळंत रोग झाला तर त्यास औषधास व वैद्यास पैसा कोठून मिळणार ! असा कोणता तुमच्यामध्ये वैद्य होता की त्याने लोकास फुक्कट औषधे दिली. "[१०]

निबंधाच्या उत्तरार्धात तिने इंग्रजांच्या आक्रमनामुळे आपल्या समाजबांधवांच्या दयनीय अवस्थेत बरीच सुधारणा झाली म्हणून त्यांनी इंग्रजाना दयाळू इंग्रज भगवंतानेच इकडे पाठविले. त्यामुळे आपल्या जमातीतील जीवनात कोणकोणत्या सुधारणा झाल्या त्या क्रमवारपणे अतिशय चिकित्सकपणे या निबंधात व्यक्त करते. ती म्हणते की इंग्रज सरकारमुळे आमच्या शेंबड्या मुलांना शिक्षणाची संधी मिळाली. आमच्या जमातीतील लोकांना, पोरांना इमारत तसेच घरणे बांधताना डोक्यावर शेंदूर घालून पुरत असत ती प्रथा बंद करण्यात आली. मांगामहारांनी बारीक पांघरूण घातले तर धर्म भ्रष्ट झाला म्हणून त्यास खांबास बांधून मारत. ती प्रथा बंद झाली. पण आता इंग्रजांच्या राज्यात ज्यास पैसा मिळेल त्याने घ्यावे. जुलमी बिगार गेली. बाजारात फिरण्याची मोकळीक झाली. अशाप्रकारे स्वजातीच्या दुःखाची कैफियत निर्भयपणे मांडण्याची प्रेरणा मुक्ताबाईला जोतीबा फुलेंच्यामुळे आली. ज्योतिरावांचे लेखन प्रकाशित होण्यापूर्वी त्यांच्या विद्यार्थिनीचा केवळ १४ वर्षाच्या मुलीचा स्फूर्ति दिसून येते. ताराबाई शिंदे यांच्या क्रांतिकारक वैचारिक निबंधापूर्वी मिसेस फरार व कुमारी मुक्ताबाई यानी कसदार लेखन करून स्त्रियांच्या वैचारिक गद्यलेखनाची पायाभरणी करून ठेवली होती.

## १.३ १९व्या शतकातील स्त्री शिक्षणाविषयी परिस्थिती :

ताराबाईंच्या काळात फार करून स्त्रिया शिकतच नव्हत्या. महात्मा फुले व सावित्रिबाई फुले या उभयंतानी स्त्री शिक्षणासाठी समाजाच्या विरुध्द जावून अनेक त्रास सहन करून शाळा काढल्या. तरी सुध्दा मुलींना शिक्षणास मिळावा तेवढा वाव व प्रोत्साहन मिळत नसे. घरच्या घरी थोडीफार अक्षर ओळख होई. ती धार्मिक पुस्तके वाचण्यापुरती. क्वचित कुणी पांढरपेशा बाईने लेखन केलेच तर फारतर पौराणिक गोष्टी गाणी किंवा ओव्या इतकेच ते मर्यादित होते. अशा काळात शिंद्यानी आपल्या मुलीला शिकवून बहुश्रुत केलेली दिसते. ताराबाईंना उत्तम शिक्षण दिलेले होते. त्याना मराठी, संस्कृत, इंग्रजी या भाषांचे उत्तम ज्ञान होते. हे त्यांच्या "स्त्रीपुरुष तुलना" या निबंध लेखनावरून समजते.

## १.४ ताराबाईंचे व्यक्तिमत्व :

ताराबाईंच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन करताना डॉ. स.ग. मालशे यांनी ताराबाईंच्या स्त्रीपुरूष तुलना या पुस्तकाचा चिकित्सकपणे अभ्यास करून ताराबाईच्या व्यक्तिमत्वाची स्वभावाची जी माहिती मिळविली आहे त्यावरून त्यांचा व्यक्तिमत्वाची कल्पना आपल्याला येते ते म्हणतात,

"ताराबाईंचे घराणे खानदानी मराठा त्यामुळे त्यांच्या कडे आरंभी गोषापध्दती असावी. समाजात मिसळणे एकंदरीत कमी असे. कोर्टकचेरीच्या कामासाठी त्या घोड्यावरून जात असत. "

अमरावतीचे सुप्रसिध्द पुढारी बॅ. रामराव देशमुख हे १९०१ ते १९०७ च्या दरम्यान बुलढाण्यात शिकत होते. त्यांच्या वयाच्या १२-१३ व्या वर्षी म्हणजे १९०५ च्या सुमारास

त्यांचे बिऱ्हाड कै. ताराबाईंच्या वाड्यानजिकच होते. ते आपले मित्र गर्दे यांच्याकडे जाताना रामरावांना ताराबाईंच्या वाड्यावरून जावे लागे. त्यांच्या वाड्यावर दोन मोठे जातीवंत कुत्रे पहारा करीत असत. त्यांची मुलांना भिती वाटत असे. पण त्याहीपेक्षा ताराबाईंच्या करड्या व्यक्तिमत्वाचे मुलांना फार भय वाटे. दुसक्या ठेंगण्या ताराबाई डोळ्याला जाड भिंगांचा चष्मा लावीत असत. आपणास ताराबाईंचा वचकच नव्हे, तर भीती ही वाटत असे व त्यांनी आपल्याला हटकू नये म्हणून आपण त्यांच्या घरासमोरून पळत पळतच पुढे जात असू. आपल्या मातोश्रीबरोबर त्यांच्या घरीही गेलेलो होतो." [१०]

बुलढाण्याचे वकील, गंगाधर गोविंद पाठक यांनी दहा बारा वर्षांचे असताना ताराबाईंना पहिलेले होते ते पत्रात डॉ. स.गं. मालशे यांना लिहितात,

" कै. ताराबाई ठेंगणी ढुसकी होती. ती डोळ्याला जाड भिंगाचा चष्मा लावी. तिच्या हातात सतत काठी असे. बुलढाण्यात सध्या जिथे टी.बी. सॅनिटोरियम आहे तिथे पूर्वी ताराबाईंची शेती होती. ताराबाई मोठ्या ऐटीत पण पायी पायीच त्या शेताकडे जात येत असे. आपण तिला घोड्यावर बसून जाताना पाहिलेले नाही. तिचा चेहरा क्रूर भासत असे. स्वभावाने ती तामसी होती. लहान मुले दिसताच ती काठी मारायला धावायची. आम्ही मुले तिला फार भीत असू. तिच्या पतीला आम्ही पाहिलेले नाही." [११]

त्या काळातल्या तुलनेने ताराबाईंच्या वाट्याला खूप वेगळे जीवन आलेले दिसते. वडिलांमुळे केवळ शिक्षणच मिळाले नाही तर शिक्षणाने जाग्या झालेल्या वाचनाच्या आवडीला भरपूर खाद्यही मिळालेले दिसते. कोर्ट कचेऱ्यांची कामे करता करता घोड्यावर बसणे व शेतीवर देखरेख करण्याकरता घोड्यावर बसणे व शेतीवर देखरेख करण्याइतके मोकळे जीवन व कर्तृत्व दाखविण्याची संधी उपलब्ध झालेली दिसते.

ताराबाईंच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू उलघडताना लेखिका " मृणालिनी जोगळेकर" म्हणतात,

"ज्या काळात नहाण आल्यावर बिनलग्नाची मुलगी घरात असणे पाप मानले जात होते त्या काळात ह्या अजिबात लग्न न करण्याचा विचार करत होत्या. हे पण विशेषच दिसते". [१२]

मालशे सांगतात, "ताराबाईंना मनातून लग्नच करायचे नव्हते. पण त्यावेळचा जमाना व जनरित लक्षात घेवून त्यांचे लग्न झाले. वडिलांनी घरजावईच शोधलेला दिसतो. पण ताराबाईना संसारसुख लाभलेले नाही. मूल ही झाले नाही." [१३]

ताराबाईंना इतके व्यक्तिस्वातंत्र्य होते मत, विचार स्वातंत्र्य असताना देखील त्यांचे लग्न त्यांच्या विरुध्द जावून तिला पसंत नसलेल्या वराशी का करून दिला असेल ? याबाबत श्रीमती विद्युत भागवत आपल्या लेखात म्हणतात,

"एकीकडे नव्या प्रवाहाच्या विचाराच्या प्रभावामुळे आपल्या मुलीला स्वतंत्र्य विचार करायला वाव घ्यायचा व दुसरीकडे आपल्या हाताने तिला रीतीरिवाजांच्या चौकटीत बंदिस्त करून टाकायचे असा कांहीसा दुटप्पी व्यवहार शिंद्यांच्या खाजगी आयुष्यात घडला होता." [१४]

## १.५ ताराबाईंची आवड :

ताराबाईंना बऱ्यापैकी शिक्षण मिळालेले होते. त्यांची बहुश्रृतता त्यांचे स्त्रीपुरुष तुलना निबंधवजा पुस्तक वाचता दिसून येते. यावरून त्यांना वाचनाची आवड होती हे स्पष्ट होते. ताराबाई त्या काळाच्या मानाने खूपच वाचन करणाऱ्या विचार करणाऱ्या असाव्यात. त्याना संस्कृत आणि मराठी साहित्य वाचनाची आवड असावी असे त्यांच्या लेखनावरून

दिसते. अर्थात त्या केवळ वाचतच नव्हत्या तर त्यावर बारकाईने विचारही करीत होत्या आणि आपले विचार सुसंगतपणे मांडण्याची कुवतही त्यांच्यामध्ये होती असेही जाणवते. वडिल सरकारी नोकरीत होते. तसेच ते फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे ते सभासद होते. त्यामुळे सहाजिकच वडिलांच्या आचारविचारांचा परिणामही ताराबाईंच्या वाचनाची आवड वृध्दंगत करण्यास कारणीभूत झाला असेल. त्या वेळेची वृत्तपत्रे 'प्रभाकर',' पुणे वैभव','दर्पण' यांचे ही वाचन त्यांनी केले असावे असे दिसते. लोकहितवादींची 'शतपत्रे' ही त्यांनी वाचली असावीत असे मृणालिनी जोगळेकर म्हणतात, कारण पुनर्विवाह केशवपन इ. बाबतीत दोघांच्या विचारात व युक्तीवादातही खूपदा साम्य आढळते. उदा. लोकहितवादी आपल्या एका लेखात म्हणतात,

"ईश्वराने स्त्री व पुरूष यासारखे उत्पन्न केले व उभयंताचे अधिकार समसमान आहेत असे असता पुरूषास पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियास मात्र मनाई हा केवढा मोठा जुलूम ? " [१५]

अशा व्यापक वाचनामुळे चिंतनामुळे ताराबाईंना सामाजिक वास्तवाबद्दल एक वेगळेच भान आलेले दिसते.

## १.६ ताराबाईंचा पोटतिडिकेने केलेला लेखन प्रपंच व त्यास कारणीभूत परिस्थिती :

ज्या काळात स्त्रियांना शिक्षणाच्या नावाखाली केवळ अक्षर ओळख होत असे ती केवळ धार्मिक पुस्तके करण्यापुरती बाईने लेखन केलेच तर फारतर पौराणिक गोष्टी, गाणी किंवा ओव्या इतकेच काय ते मर्यादित होते. तेव्हा मनात प्रश्न येतो की अशा काळात

अवतीभवती घडणाऱ्या अन्यायी घटनाविषयी आपण लिहावे, असे ताराबाईंना कसे सूचले असावे ? श्री. मालशे म्हणतात,

"एका मराठाबाईने धार्मिक व पौराणिक स्वरूपाचे नव्हे तर सामजिक ज्वलंत प्रश्नासंबंधी स्त्रीपुरूष तुलनेसारख्या प्रश्नावर १८८२ साली एक दीर्घ निबंध लिहावा ही खरोखरंच नवलाईची गोष्ट म्हटली पाहिजे." [१६]

पण ताराबाईंनी "स्त्रीपुरूष तुलना" हा जो निबंध लिहून लेखन प्रपंच केला त्याला तत्कालीन कारण घडले सुशिक्षित ताराबाई भोवतालचे स्त्रियांचे जगणे पाहून आधीच अस्वस्थ झालेल्या होत्या, अन्याय रूढीविषयी चिडलेल्या तशात एक दिवस २६ मे, १८८१ रोजी "टाईम्स ऑफ इंडिया" मध्ये बातमी आली की, "सुरत जिल्ह्यातील ब्राह्मण जातीतील एक विधवा स्त्री ' विजयालक्ष्मी' हिने भ्रूणहत्त्या केली, म्हणून तिला फाशीची शिक्षा देण्यात आली. पुढे लोकांच्या व काही संस्थांच्या मजूरीची शिक्षा देण्यात आली. " [१७]

"स्त्रीपुरूषतुलना" या पुस्तकाच्या संदर्भात ' विजयालक्ष्मी केस ' हा विषय अतिशय महत्वाचा आहे. कारण या केससंबंधीचे विचारप्रकटन जर ताराबाईंच्या वाचनात आले नसते, तर त्यांच्या हातून कदाचित पुस्तकाचे लेखनही झाले नसते. विजयालक्ष्मी या विधवेवर ओढवलेल्या दारूण प्रसंगातून जे काहूर माजले त्यामुळे ताराबाई शिंदे यांना सात्विक संताप आला व तो प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने अभिव्यक्त झाला. तो विजयलक्ष्मीची हकीगत संपादक विलास खोले यांनी अशी दिली.

" सुरत जवळ असणाऱ्या उलपाड या गांवी राहणारी विजयालक्ष्मी नावाची चोवीस वर्षाची ब्राह्मण कुटुंबातीलएक तरूण विधवा इ.स. १८८० च्या अखेरीस गरोदर असल्याचे

तेथील पोलीसास कळले. ते कळल्यावर तो तिच्या घरी जावून स्वत: खात्री करून आला आणि विजयालक्ष्मीने गुपचूप भ्रुणहत्या करून टाकू नये यासाठी जिल्ह्याच्या मॅजिस्ट्रेटकडे ही बाब कळविली. १९८१ च्या मार्च महिन्यात मृत नवजात अर्भक खेड्यातील कचऱ्याच्या ढिगांवर आढळले. त्यानंतर खेड्यातील पोलीस प्रमुखाने विजयालक्ष्मीची गाठ घेतली आणि तिने भ्रुणहत्या केल्याच्या आरोपावरून त्यांनी तिला सुरतेस आणून सेकण्ड क्लास मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले. मॅजिस्ट्रेटपुढे विजयालक्ष्मीने मुलाला जन्म दिल्याचे व लज्जाभयास्तव स्वयंपाकघरातील तबिल्हा नावाच्या वस्तूने त्याचा जीव घेतला असल्याची कबुली दिली. एका मोलकरणीने ते बालक कचराकुंडीत टाकून दिले." [१८]

या घटनेवरून १९८१ च्या एप्रिल महिन्यात विजयालक्ष्मीवर खटला चालला. या खटल्याला फार मोठी प्रसिध्दी मिळाली ही बातमी त्यावेळच्या अनेक वृतपत्रातून निकालपत्र व निकालपत्रावरील आग्रलेख एवढा प्रचंड मजकूर छापून आला. संपादक विलास खोले प्रतिनुसार [१९]

| | | |
|---|---|---|
| १. | 'द टाईम्स ऑफ इंडिया' | २६, २७ मे, १८८१ |
| २. | 'द बॉम्बे समाचार ' | २७ मे व १५ जून, १८८१ |
| ३. | 'अखबारे सौदागर ' | २७ मे, १८८१ |
| ४. | 'जामे जमशेद ' | २७ मे, १८८१ |
| ५. | 'द रस्ट गफ्तार ' | २९ मे, १८८१ |
| ६. | 'द गुजराती' | २९ मे व ३ जुलै, १८८१ |
| ७. | 'द गुजराती मित्र' | २९ मे, १८८१ |
| ८. | 'इंदुप्रकाश ' | ३० मे, १८८१ |

| | | |
|---|---|---|
| ९. | 'द समशेर बाहदूर ' | ३ जून, १८८९ |
| १०. | 'इंडियन सेक्टरर ' | ५ जून, १८८१ |
| ११. | 'सत्यमित्र ' | १२ जून, १८८१ |

विजयालक्ष्मी खटल्याचा परिणाम ताराबाईंच्या मनात खोलवर रूजला गेला. तसेच समाजामध्ये वेगवेगळ्या घटनादेखिल घडत होत्या. त्याचाही परिणाम कदाचित ताराबाईंवर होवून त्यांची लेखनी स्त्रीयांनी अधोगतीस नेणाऱ्या परंपरा रूढी अन्याय याविरूध्द लेखन करण्यास प्रवृत झाली असेल. ' विजयालक्ष्मी ' नामक विधवेने केलेली भ्रृणहत्त्या व नंतर " पुणेवैभव" या सनातनी वृत्तपत्रानी स्त्रीजातीविरूध्द उठवलेली टीकेची झोंड हे या निबंधाचे तत्कालीन निमित्तकारण आहे. स्त्रीकडे पाहण्याची समाजबांधवांची दृष्टी आणि स्त्रीजातीला बदनाम करण्याची त्यांची वृत्ती यामुळे ताराबाईं अस्वस्थता आली व त्याना कदाचित लेखनप्रेरणा मिळाली असेल. त्याकाळी समाजमानसात स्त्रीची प्रतिमा ही जात्याच घातकी, उध्दट, निसर्गत: अनीतीकडे कल असणारी, चंचल, मूर्ख परमार्थ मार्गातील अडचण अशी निर्माण केली गेली होती. एखाद्या स्त्रीकडून रूढीच्या अमानुष बंधनामुळे काही प्रमाद, घडलाच तर संपूर्ण स्त्री जातीला सनातनी वृत्तपत्रे झोडपून काढीत असत. ह्या साऱ्याबाबत मनात साठत आलेली चीड ह्या निबंधात विजयालक्ष्मी प्रकरणाच्या निमित्ताने ताराबाईनी स्त्रीपुरूषतुलना या निबंधात व्यक्त केलेली दिसते.

## १.७ ताराबाईंची भूमिका :

ताराबाईंच्या घरचे वातावरण सुशिक्षित होते त्यामुळे त्या जरी बुलढाण्यासारख्या गावात रहात असल्या तरीपण मुंबई पुण्याकडे प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रांचे बारकाईने वाचन

करत होत्या. त्याकाळी मध्यम वर्गाला वृत्तपत्र विकत घेणे परवडत नव्हते. तशी प्रथाही नसावी. याचा संदर्भ मृणालिनी जोगळेकर देताना लिहितात.[२०]

मी स्वत: नव्वदीच्या आसपासच्या स्त्रियाजवळ विचारणा केली त्यावेळी जाणवले की, गावात येणारी तुरळक वृत्तपत्रे केवळ पुरूष वर्ग वाचत असे. बायकांनी वृत्तपत्रे वाचणे अशिष्टपणाचे मानत याचा प्रत्यय रमाबाई रानड्यांच्या आत्मकथनातही येतो. त्या सांगातात –

" एकदा केरात सापडलेला इंग्रजी वर्तमानपत्राचा कपटा मी केर थांबवून वाचत उभी राहिले तर घरातील वडिलधाऱ्या बायका राग येवून मोठ्याने ओरडून म्हणाल्या, तुझे हापीस माडीवर आहे तिथे तुम्ही वाचा कि नाचा, आमचा अपमान केलात तर खबरदार. "[२१]

न्यायमूर्ती रानड्यांसारख्या घरात ही स्थिती मग इतरत्र स्त्रियांच्या वाचनाबाबत काय अवस्था असेल याची सहज कल्पना करता येईल. अशा या रूढीप्रियतेच्या काळात ताराबाई वृत्तपत्रे वाचतात. इतकेच नव्हे तर वृत्तपत्रातील घटनाबाबत त्या चिकित्सकपणे आपली मते मांडताना दिसतात. समाजात घडणाऱ्या घटनांचा त्या जागरूकपणे विचार व अन्वय जोडताना दिसतात. स्त्रियांच्या वाट्याला आलेले पराधीन जीवन, अमानुष रूढी, परंपरा अंधश्रध्दा व त्यामुळे त्यांची होणारी केविलवाणी अवस्था ह्या सर्वाकडे ताराबाई एका वेगळ्या धारधारपणे पाहताना दिसतात आणि पाहता पाहता स्त्री जीवनाच्या सर्व समस्यांच्या गाभ्यालाच त्या भिडलेल्या दिसतात. ताराबाईंची भूमिका इतर बहुसंख्य उदार मतवादी सुधारकासारखी, भूतदयावादी मानवतावादी नाही जे सती, सक्तीचे वैधव्य, केशवपन या रूढींचे उच्चाटन करून स्त्रियांना ह्या दु:खातून मुक्त करावे. शिक्षण देवून पतीला अनुरूप सहचारी बनवावे अशी भूमिका दिसते. पण ताराबाई ह्या साऱ्या दु:खाना छेद देवून त्यांच्या मुळाशी असणाऱ्या पुरूष श्रेष्ठत्वाच्या अहंकारी वृत्तीवरच हल्ला चढविताना दिसतात.

त्यांच्या या निबंधाचे सरळ दोन भाग दिसून येतात. पहिल्या भागात धर्मरूढी, परंपरा ह्या नावाखाली विषमता व दुटप्पीपणा ह्यावर त्या मारा करतात व दुसऱ्या भागात स्त्रियांना जी जी म्हणून भूषणे लावली जातात जे जे दोष त्यांच्यावर लादले जातात ते ते सर्व पुरुष वर्गातच कसे आहेत ते त्या उदाहरणे देवून दाखले देवून नाट्यमय प्रसंग चितारून उपहास करून तर कधी तळतळाटाने पटवून देताना दिसतात. उदा.

स्त्री प्रत्यक्षात अज्ञानी असते, स्वभावत: ती नाजूक व अशक्त असते. त्यामुळे तिच्या गळ्यात सर्व प्रकारच्या दोषांचे लोढणे बांधण्यात येते. तिच्यावर केले जाणारे दोषारोप कसे बिनबुडाचे आहेत ते ताराबाईनी दाखवून दिले आहे. आवर्त संशयानाच हा भर्तहरीचा श्लोक तसेच कैफैयीच्या हट्टाच्या संदर्भातील स्त्री ही कुऱ्हाडीशी सकळवृक्ष तोडी या सारख्या ओव्या देवून त्यात आलेल्या स्त्री म्हणजे ,

१) जारणमारण यंत्र

२) संशयपरिभ्रमाचा भोवरा

३) उध्दटपणाचे माहेरघर

४) अविचारकर्माचे नगर

५) सकल दोषांचे निधान

६) कापट्याची खाण

७) दुर्गुणाचे उत्पत्तीस्थान

८) मोक्षमार्गातील धोंड [२१]

या सारखे आक्षेप क्रमवार खोडून काढले आहेत. त्यांचेच दात त्यांच्याच घालण्याचे यंत्र अवलंबिले आहे. पुरुषाना सवालामागून सवाल केले आहेत. हे त्यांच्या वादपटुत्वाची उत्तम साक्ष पटवितात. त्यातले काही सवाल असे -

१) स्त्रिया पूर्वीप्रमाणे नम्र वर्तन करीत नाहीत असे तुम्ही म्हणता, पण इंग्रजी राज्य आल्यापासून तुम्ही किती बदलला आहात ? तुम्ही साहेबी थेर करून धर्म मोडता आणि बायका मात्र अगदी पूर्वीप्रमाणे बालबोध रीतीने वागाव्या अशी अपेक्षा कशी करता ?

२) पतिनिधनाबरोबर स्त्रीला केशपवन करायला लावून तिला घर कोंबडी बनवता मग त्याच न्यायाने पत्नी मेल्यावर तुम्ही आपल्या दाढीमिशी भादरून अरण्यात का राहात नाही ?

३) पुरुषानी अनेक बायका म्हणे शास्त्राला चालते, मग स्त्रियांना अनेक पतीना धरण्याची मोकळीक का नाही ?

४) स्त्रीवर परदाराचा आरोप करता पण प्रथम तुम्हीच फूस लावल्यामुळे स्त्रीचे पाऊल वाकडे पडते ना ?

५) बुवाबाजीमध्ये स्त्रियांना नादी लावणारे पुरुषच असतात अमूक बाई गोसाव्याच्या वेशाने पुरुष पळवून नेला असे कधी आढळते का ?

६) वेश्या या सुध्दा पुरुषानी फशी पाडलेल्याच स्त्रिया नसतात का ?

७) सत्यवती कुंती यांनी नाही का एका अर्थाने पुनर्विवाह केला ? मग ते का निषिध्द नाहीत ? आता शंकरजन्य संततीला रूची लेकावळा असे हिणवता, मग व्यास कर्णांना तशी नावे का ठेवीत नाही ?

८) पुराणातील पंचपतिव्रतांची चरित्रे विचित्र नाहीत काय ? पुत्रसंतान नाही, म्हणून ऋषी पासून वंशवृध्दी केली गेली तो व्यभिचार नव्हता काय ?

९) सावित्री प्रिय पतीचे प्राण आणण्यासाठी यमाच्या प्रत्यक्ष दरबारात गेली पण आपली प्रिय पत्नी मेली तर, तिच्यासाठी प्रत्यक्ष दरबार सोडा, त्याच्या वाटेवर एखादा पुरूष कधी गेल्याचे उदाहरण आहे का ? उलट तिच्या मृत्यूनंतर दहाव्या दिवशी बोहल्यावर चढण्याची तुमची तयारि नसते काय ?

१०) आनंदीबाईसारख्या अनर्थकारी बाईची तुम्ही उदाहरणे देता पण वतनवाडीसाठी तुम्ही विषप्रयोग करीत नाही काय ? [२३]

" स्त्रियांची आजची दयनीय स्थिती पालटायची असेल तर पुरूष श्रेष्ठत्वाची कल्पना मोडून काढणे, स्त्री-पुरूष-समानतेचा आग्रह धरणे, स्त्रियांनी शिक्षण घेणे ह्या गोष्टीबरोबर ताराबाई आणखी एका गोष्टीचा आग्रह धरतात ती गोष्ट म्हणजे कायद्याची मदत. स्त्रियांवरील अत्याचार दूर करणारे कायदे मग ते परकीय राजसत्तेने केलेले असले तरी ते अत्यंत आवश्यक आहेत. असे त्यांचे मत दिसते. जेव्हा इंग्रजांनी हिन्दुस्थानातील अनिष्ट चालीरितीबद्दल कायदे केले त्यावेळेस तेव्हा परकीय सरकारला आम्ही आमच्या धर्मात हात घालू देणार नाही, आमच्या सुधारणा आम्ही करू असे वृत्तपत्रातून ओरड चालू असे. अशा

लोकांना उद्देशून त्या म्हणतात, आमचे धर्मात हात घालू नये म्हणणारे तत्कालीन धर्माभिमानी इंग्रजांचे खाणेपिणे वेषभूषा, रितीरिवाज ह्यांचे परस्पर अनुकरण करण्यात मात्र धर्मभ्रष्टता मानत नव्हते, त्याविरूध्द आरडाओरड करत नव्हते. अशा धर्ममार्तंडाचा ताराबाईंना फार राग येतो. संपूर्ण निबंधात ताराबाईची भूमिका स्त्रीपुरूष समानतेविषयी मांडलेल्या विचारानी स्पष्ट झालेली दिसते. " स्त्रियांची स्थिती सुधारायची असेल तर प्रथम या पुरूषवर्चस्वाच्या भावनेचा बिमोड व्हायला हवा. हे इतक्या स्पष्टपणे तत्कालीन कोणत्याही सुधारकाने जाणलेले दिसत नाही व ते करण्याचा इतका प्रभावी प्रयत्नही कुणी केलेला दिसत नाही.") असे उद्‌गार मृणालिनी जोगळेकरांनी काढलेले आहे. [२४]

ताराबाई आपल्या निबंधाच्या शेवटी म्हणतात, " पुरूष सदाचारी झाल्यास आनंदी आनंद होवून घरोघर पतिव्रत्याचे निशाण उंच उडून चंद्राला देखिल लज्जा आणिल... स्त्रियानी आपल्या दृढनिश्चयाचे बळाने सदा अन्तर्बाह्य निर्मळ राहून पुरूष जातीस लाजवून खाली पाहण्यास लावावे यावेग्हे त्यांच्या लक्ष्मी ह्या नावास साजण्याजोगे दुसरे भूषण नाही. सदा पतिव्रता सदाचरणी बाण्याने दोन्ही कुळात बिजलीप्रमाणे चमकत रहाण्याकरता मुलाबाळानासुध्दा लक्ष्मीच्या पूर्ण वैभवात नांदवून सौभाग्याचा मळवट कपाळी भरून संसाराचा शेवट गोड होण्याकरिता जगत्रियंत्या परमेश्वराची प्रार्थना करून हा निबंध संपविते." [२४]

ह्यातून त्या स्त्रीजीवनाच्या साफल्याविषयी आपली कल्पना व्यक्त करतात. पातिव्रत्य हे मूल्य त्या मानतातना दिसताना शील हे स्त्रीचे भूषण आहे असे मानतात. संसार हे तिचे क्षेत्र हा पारंपारिक विचार ही त्या स्पष्ट करतात.

तथापि, ह्या संसारात तिला सन्मान व प्रतिष्ठा असली पाहिजे तिचे महत्व श्रेष्ठत्व पुरूषवर्गाने जाणले पाहिजे. हा स्त्रीपुरूष समानतेचा मूलभूत विचार त्यानी आग्रहाने मांडलेला दिसतो. स्त्रियांची बाजू घेवून पुरूषवर्गावर ताराबाईंनी आपल्या लेखणीने जरी आसूड ओढले असले तरी स्त्रीयांकडे त्या कोणत्याही स्वप्नाळू आदर्शवादी दृष्टीने बघताना दिसत नाहीत. स्त्रियांचे मूल्यमापन ही त्या खूपशा वस्तुनिष्ठपणे करताना दिसतात. त्या म्हणतात,

"या जगातील सर्व स्त्रिया प्रखर सूर्याच्या तेजाप्रमाणे सतेज अन्तर्बाह्य गंगाजलाप्रमाणे निर्मल आहेत, असे मुळीच नाही." [२५]

ताराबाईंच्या लेखी स्त्री व पुरूषांचे निसर्गदत्त कार्य व कर्तव्य वेगवेगळे असले तरी दोन्ही गोष्टी आपापल्या ठायी समान महत्वाच्या व परस्परपूरक आहेत. तेव्हा दोन्ही पक्षांनी परस्पराविषयी समान आदर ठेवला पाहिजे. समान निष्ठा जपल्या पाहिजेत. समान हक्क व समान बंधने स्वीकारली पाहिजे अशी ताराबाईंची भूमिका दिसते.

## १.८ ताराबाईंचा बहुश्रुतपणा :

ताराबाईंचे वाचन केवळ पोट्यापुराणे किंवा वृत्तपत्रे एवढ्यापुरते मर्यादित नव्हते तर तत्कालीन लोकप्रिय कादंबऱ्यांचेही त्यानी डोळसपणे वाचल्या होत्या. हे त्यांनी आपल्या निबंधात दिलेल्या उदाहरणातून दिसून येते.

वृत्तपत्रीय उल्लेख विजयालक्ष्मी प्रकरणाचे उल्लेख सार्वजनिक, सभेच्या कार्यासंबंधी शेरे "मंजुघोषा" कादंबरीचा उल्लेख, आनंदीबाई झाशीची राणीचा ऐतिहासिक उल्लेख "लव्ह बिगेटस् लव्ह" – इंग्रजी म्हण - मांजराच्या गळ्यात घंटा बांधाण्याची इसापनितीची कथा आंधळ्या मातेसमोर बढाई मारणाऱ्या मुलाची कथा, बिरबल बादशहाची कथा – ग्रीक रोमन लोकात व्यभिचाराला जबर शिक्षा असल्याची नोंद पौराणिक दाखले (रामविजय, हरिविजय)

पांडवप्रताप जैमिनी, अश्वमेध ग्रंथातले दाखले - अहिल्या द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी यांच्या चारित्र्याचे दाखले. सत्यवती, कुंती यासारख्या कुमारी मातांचा उल्लेख ताराबाईंनी तत्कालीन कादंबरींचा ही उल्लेख केलेला आहे. 'मंजुघोषा', 'मुक्तामाला' तसेच नाटक, तत्कालीन समाजात रूढ असलेल्या म्हणींचाही उपयोग त्यांनी या निबंधात केलेला दिसतो.

उदा:

१) 'एक मशाल दहा दिवटे'

२) ' पारखा पाय घराला अपाय'

३) 'ज्यांचे हाती ससा तो पारधी बाकी सारे गैदी'

४) 'श्रीमंत असले म्हणजे अमीर'

'भिकारी हुये तो फकीर'

बरे आता मेल्यावर तर पीर

५) 'हागवणी बायको नागवणी सोयरा'

६) 'नाऱ्याने केले केशाला प्रायश्चित '[२७]

यासारखा उल्लेख ताराबाईंच्या लेखनात सतत दिसून येतात, त्यांच्या निबंधलेखनाची शैली बोली भाषेशी अतूट नाते दिसून येते. या निबंधाच्या शैलीवरून असे दिसून येते की ताराबाईंस मराठी संस्कृत इंग्रजी भाषांचे उत्तम ज्ञान होते. त्यांचे वाचनही भरपूर व चौकस होते. असे वाटते त्यांच्या लेखनशैलीबद्दल मृणालिनीताई म्हणतात, "ताराबाईंचा हा निबंध वाचत असताना त्यांची समर्थ बहुरूपी लेखनशैली सतत जाणवत राहते. तिच्यातून त्यांचे

प्रगल्भ ताठ व्यक्तिमत्व डोकावतो. बोली भाषेच्या जवळ जाणारी, वाक्प्रचार व म्हणी ह्यांनी घरगुती वाटणारी, स्त्री जीवनाशी संबंधित उपमा पेरित जाणारी ही शैली, पुरूष वर्चस्व व स्वामित्व भावनेवर हल्ला करताना तितकीच आक्रमक दिसते. उपरोध, उपहास, विडंबन, मोरीबाजपणा ह्यांच्या वापराने मध्येच मिस्किल रूप धारण करणारी ही शैली नाजुक, अवघड विषयाबद्दल बोलताना संस्कृत प्रचुर होते व त्यामुळे एक भारदस्त डौल तिच्यात आलेला दिसतो." [२८]

ताराबाईंचा जीवनकाल लक्षात घेता या पुस्तकातून ताराबाईंचे जे व्यक्तिमत्व साकार झाले आहे ते सर्वगुणसंपन्न अशाच प्रकारचे आहे. ज्या काळात परंपरावादी आणि सुधारणावादी यांच्या मतांमध्ये संघर्ष चाललेला होता त्याकाळी ताराबाईसारखे सुधारणावादी विचार व्यक्त करणारे व्यक्तिमत्व जन्माला आले हे त्या काळाचे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. पुरूषप्रधान संस्कृतिचा पगडा असतानाही ताराबाई मार्मिकपणे पुरूषांच्या दुर्गुणावर आपल्या लेखनीने ताशेरे ओढतात. जाती किंवा कुळ कोणते आहे यावरून स्त्रीकडे बघण्याची दृष्टी बदलत नाही. सर्वत्र ती सारखीच आहे, असे त्यांना वाटते. एकूणच स्त्री म्हणूनच त्या स्त्रीचा विचार करतात. आणि त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे त्याना देशभगिनींचा अभिमान धरावासा वाटतो. त्यांच्या मनात स्त्रित्वामुळे न्युनत्व आलेले नाही ही फार महत्वाची बाब आहे.

## १.९ ताराबाई शिंदे आणि सत्यशोधक समाज :

कै. ताराबाईंचे वडिल बापूजी हरी शिंदे हे सत्यशोधक समाजाचे सभासद होते. त्यांचे काका रामचंद्र शिंदे जोतिरावांच्या व्यवसायातील भागिदार होते. त्यामुळे ताराबाईंना सत्यशोधक समाजाबद्दल आवड होती. त्यांचे विचार आणि जोतिरावांचे विचार व लेखन

यांची तुलना केली असता दोघांमध्ये फार मोठे विचार साम्य आढळते. ताराबाईंनी देव, ऋषी, धर्म या संबंधी क्रांतीकारक विचार व्यक्त केलेले आहेत. तसेच य.दि. फडक्यानी संपादित केलेले महात्मा फुले संग्रह या संदर्भावरून बोलता येईल की फुल्यांनी देखील जहाल स्वरूपाची टीका केली आहे. किंबहुना रूढ पारंपरिक समजुती दूर सारून फुल्यांनी देव, ऋषी आणि धर्म यासंबंधी क्रांतीकारक विचार मांडून वैचारिक उलथापालथ घडवून आणली.

ताराबाईंचा लेखनातील अन्यायाविरूध्द आवाज उठविण्याची तयारी आणि तर्कशुध्द विचारसरणी हा त्यांच्या व्यक्तीमत्वावर प्रागतिक विचारावर जोतिरावांच्या विचाराचा प्रभावाचा परिपाक म्हणता येईल. अशाप्रकारचे लेखन व विचार या दोहोत साम्य असतानाही ताराबाईंचे स्त्रीपुरूष तुलना हे निबंधात्मक पुस्तक इ.स. १९७५ पर्यंत अंधारात का राहिले असा प्रश्न अभ्यासकास तर पडतोच पण ही आवृत्ती ज्यांनी ज्यांनी संपादित केली त्या संपादकांनाही पडतो. उदा. डॉ. स.गं. मालशे, १९७५, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले १९९२, संपादक विलास खोले १९९७ तसेच मृणालिनी जोगळेकर स्त्री अस्मितेचा आविष्कार १९वे शतक या सर्वांचे विचार वेगवेगळे आहेत. प्रत्येक संपादकांनी आपले तर्क वेगवेगळया प्रकारे व्यक्त केलेले आहेत.

## १) डॉ. स.गं. मालशे :

"ताराबाईंचे घराणे खानदानी असल्याने त्यांच्याकडे गोषापध्दतीही असावी समाजात मिसळणे एकंदरीत कमी कोर्टकचेऱ्यांच्या कामासाठी घोड्यावरून बसून जात त्यांच्याअंगी लेखनही सुप्त गुण बरेच असावेत पण प्रतिष्ठित घराणे, समाजात चमकण्याआड येणारी पडदपोषी व संसारात जीवनात झालेली कुचंबणा यामुळे

त्यांच्या अंगच्या गुणांचा प्रकाश पडावा तसा पडत नाही. स्त्री पुरूष तुलना या पुस्तकासारखा एखादाच निसटता किरण चुकून मागे राहिलेला आहे. १९७५." [२९]

संपादक विलास खोले - ज्या पुस्तकाच्या माध्यमातून ताराबाईंनी स्त्रियांचे प्रश्न अतिशय तळमळीनी व हिरीरीने मांडले त्या पुस्तकाला स्त्रियांकडून कोणता प्रतिसाद लाभला हे पाहावयास लागले की अपेक्षाभंग होतो. पंडिता रमाबाई डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई यांच्यापैकी एकीनेही ताराबाईंच्या पुस्तकांचा उल्लेख केलेला आढळत नाही. म्हणून विलास खोलेंना असे वाटते की,

"ताराबाईंच्या लेखनातील प्रक्षोभक आशय सौम्य प्रवृत्तीच्या लेखिकेंना मानवला नाही का ? कळत नकळत त्याही ब्राहमणी मूल्यव्यवस्थेच्या प्रभावाखालीच वावरत होत्या का ? केवळ जोतीरावानी सत्सार मध्ये पुस्तकाची भप्रांवण करूनही सत्यशोधक समाजाशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींपैकी देखिल कोणी स्त्रीपुरुष तुलना ची नोंद करू नये याचे आश्चर्य वाटते. याबरोबरच विलास खोले पुढे म्हणतात की, कदाचित ब्राह्मणी मूल्यव्यवस्थेवर व पुरूषावर कठोर आघात करणाऱ्या जोतिरावांच्या विचारपरंपरेतील एका अब्राह्मण स्त्रीच्या विचारांची बूज राखावी असे त्यावेळेच्या मंडळीना वाटले नसेल. " [३०]

मृणालिनी जोगळेकर - स्त्री समस्यांचा मूलभूत विचार ज्यात केलेला आहे, ज्यात पुरूष वर्चस्वाला रोकडे आव्हान दिलेले आहे असे हे पुस्तक व त्याची लेखिका पडद्याआड इतक्या सहजपणे कशा लोटल्या गेल्या त्याचे उत्तर शोधताना बऱ्याच शक्यता जाणवतात.

१) ताराबाई तत्कालीन सुधारणांचे व चळवळीचे जे क्षेत्र मुंबई व पुणे त्यापासून दूर वऱ्हाडात बुलढाणा नामक गावात रहात होत्या.

२) ताराबाई ब्राम्हणेतर जातीतील होत्या त्या मराठा होत्या आणि त्या काळातील व नंतरच्या काळातही लेखन प्रकाशन हे प्रामुख्याने वरिष्ठ वर्गाच्या हातात असल्याने त्या दुर्लक्षिल्या असतील.

पण नवल याचे वाटते की फुल्यानी ज्या पुस्तकाचे व त्यातील मुद्देसूद लेखनाचे एवढे कौतुक केले त्याबद्दल त्यांचे अनुयायी सत्यशोधक समाजातील लोकांनीदेखील या पुस्तकाचे व त्यातील मूलभूत विचारांचे कौतुक कसे केले नाही ? एक मराठा समाजातील स्त्री पुढे येवून स्त्रियांच्या समस्यांचा इतका मूलगामी विचार मांडते तेव्हा तिला सत्यशोधक समाजातील लोकांनी, सुधारणावादी उच्चवर्णीयानी उचलून घ्यायला हवे होते. पण तसे झालेले दिसत नाही.

ताराबाई कुणालाच झेपलेल्या दिसत नाहीत हे खरे. इथे श्रीमती विद्युत भागवत यांनी आपल्या लेखात उभा केलेला विचार आठवतो.[३१]

"स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार करणाऱ्या सत्यशोधक समाजाने सत्यशोधक ताराबाईना (कार्यकर्त्या सावित्रिबाईना) आपले सभासदही करून घेतलेले दिसत नाही. "

खरोखर ताराबाई शिंदे ही एक सत्यशोधक व्यक्ती होती. समाजातील सत्य व असत्य घटनावर जळजळीत प्रकाश टाकणारी बाई यांना सत्यशोधक समाजाचे सभासदत्व नव्हते याची खंत मनाला लागून राहते. पण आजही ताराबाईनी व्यक्त केलेल्या विचारांचा जर का आपण विचार केला तर असे वाटते की, " स्त्रीपुरूष तुलना" ही कलाकृती, 'अक्षय' आहे.

अनंतकालाच्या सीमा ओलांडून ती कितीही पुढे गेली तरी ती ताजीच राहणारी आहे. त्यामधील विचाराचे झरे हे त्या त्या काळात पटण्यासारखेच राहणार आहेत. म्हणून मृणालिनी जोगळेकरानी व्यक्त केलेले विचारही सार्थक वाटतात. त्या म्हणतात,

"तत्कालीन समाजाने ताराबाईना उपेक्षिले तरीपण आज आपल्याला मोकळेपणाने कबूल करावेसे वाटते की आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीतील कितीतरी मागण्यांची "पूर्वसाद" ताराबाईंच्या या छोटया निबंधातून ऐकू येते. ह्या छोट्या निबंधातून तत्कालीन सर्व सामान्य स्त्रियांपेक्षाच नव्हे तर तत्कालीन सुशिक्षित उच्चवर्णिय स्त्रियांपेक्षाही ही स्त्री किती वेगळी होती व किती पुढच्या काळाशी नाते जोडत जोती हे लक्षात येते." [३२]

## १.१० समारोप :

स्त्रीपुरूष तुलना हे एक छोटेखानी पुस्तक एक निबंधवजा पुस्तक जे १९व्या शतकात इ.स. १८८२ मध्ये कै. ताराबाई शिंदे यानी लिहिलेले आहे. ताराबाई शिंदे ज्या काळात वाढल्या, जगल्या तो काळ आजच्या काळापेक्षा फार वेगळ्याप्रकारच्या वातावरणाने भारलेला होता. ज्या काळात शिक्षण केवळ पुरूषानीच घ्यावे वृत्तपत्रे केवळ पुरूषानीच वाचावे स्त्रियानी घोषात रहावे, फार तर अक्षर ओळख होईपुरते, पोथ्या, पुराणे, ओव्या इतके लिहिणयावाचण्यापुरते अशा काळात कै. ताराबाई शिंदे यानी स्त्रिया व पुरूष यात साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध रचिला. १९व्या शतकातील प्रतिकूल परिस्थितीत जिथे सनातनवादी व सुधारणावादी या दोन वादामध्ये संघर्ष चाललेला होता. इंग्रजांचे आगमन होवून त्यांचा कल सुधारणा करण्याकडे मुलीना शिक्षण घेण्यास सुरूवात केली होती त्यानी लेखन करण्यास सुरूवात केली होती. अशा काळात ताराबाई शिंदे यानी स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारांचे डोळसपणे निरीक्षण करून पुरूषांच्या क्रूरवृत्तीवर स्पष्टपणे

माळी



ताशेरे ओढलेले आहेत. अशा व्यक्तीचा जीवनक्रम कशाप्रकारे होता ? त्यांचे व्यक्तिमत्व कसे होते ? याचा अभ्यास करणे गरजेचे वाटते. त्यानिमित्ताने या प्रकरणात ताराबाईंचा व्यक्तिमत्वाबद्दल अभ्यास करण्याचे प्रयत्न केले गेले आहेत.

याबाबत प्रथम ताराबाईंचा जन्मकाळ निश्चित असा कुठेही मिळत नाही. पण डॉ. स.ग. मालशे यांनी अतिशय परिश्रम करून स्त्रीपुरूष तुलना ताराबाई शिंदे ही मूळसंहिता १९७३ साली मिळविली व त्यापुस्तकावरील पत्ता ताराबाई शिंदे - बुलठाणे प्रांत व्हऱ्याड एवढ्या संदर्भावरून तेथे जावून जवळ जवळ नव्वद वर्षापूर्वीची माहिती गोळा केली व त्यावरून त्यांचा जन्मकाळ इ.स. १८५० ते १९१० असा प्रसिध्द केला. त्यांच्या घराण्याची माहिती कुटुंबातील लोक वडिलांची नोकरी, त्यांची संपत्ती ताराबाईंचे शिक्षण त्याना येणाऱ्या भाषा, त्यांची आवड निवड, ताराबाईंचा स्वभाव, त्यांचे लग्न, लग्नाबद्दलचे विचारपण ताराबाईंच्या नवऱ्याचे नांव व्यवसाय त्यांच्या वैवाहिक जीवनाबद्दल काहीच माहिती उपलब्ध नाही. त्यांचा वंश पुढे वाढला नाही. त्यांना वैवाहिक जीवनाचे सुख लाभले नाही. तसेच त्यांचे लग्न हे त्यांच्या इच्छेविरूध्द झाले होते. तसेच त्यांच्या वडिलानी घरजावई म्हणून त्याना घरीच ठेवून घेतले होते. एवढीच माहिती उपलब्ध आहे. त्यावरून ताराबाईंच्या जन्मकाळ बालपण त्यांचा स्वभाव व वैवाहिक जीवन याचा अंदाज येतो.

ताराबाईंचे संस्कृत, इंग्रजी व मराठी भाषावर प्रभुत्व होते. त्याचे वडिल सरकारी नोकरीत असल्यामुळे शिक्षण ही चांगले मिळालेले होते. वडिल महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाचे सभासद होते. त्यामुळे त्यांच्या घरी वृत्तपत्रे घेतली जात असत. त्यामुळे घराबाहेरच्या जगात काय चालले आहे याचे ज्ञान ताराबाईंना सहजपणे मिळत असे. त्यामुळे ताराबाईंच्या लेखनाआधी मिसेस फरार व फुलेंची मांग विद्यार्थिनी मुक्ताबाई हिचा मांग

महाराच्या दु:खाविषयी निबंध, तसेच समाजात ज्या ज्या घटना घडत असत, त्याचे ज्ञान तिला वृत्तपत्राद्वारे मिळत गेले. त्यामुळे तिच्या या वाचनाच्या आवडीने बहुश्रृतता वृध्दींगत झाली. तिची बुध्दी प्रगल्भ झाली असावी आणि अशाच वेळेस २६ मे, १८८१ मध्ये टाईम्स ऑफ इंडियामध्ये एक बातमी आली, "सुरत जिल्ह्यातील ब्राह्मण जातीतील एका विधवेने "विजयालक्ष्मी" हिने "भ्रुणहत्या" केली म्हणून तिला फाशीची शिक्षा देण्यात आली. पुढे लोकांच्या व काही संस्थांच्या खटपटीमुळे ती कमी करत शेवटी तिला पाच वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा देण्यात आली. " या एका बातमीवरून ताराबाईंचे स्त्रीजीवनाबद्दलचे विचारचक्र सुरू होवून विजयालक्ष्मींचा खटला व त्यावरील प्रतिक्रिया ही त्याकाळातील जवळ जवळ दहा वृत्तपत्रातून छापून आली व एका स्त्रीच्या अब्रूचे धिंडवडे काढले गेले. याबरोबरच समाजातील इतर घटनांचाही त्यांच्या मनावर खोलवर परिणाम होवून केवळ प्रत्येक घटनेस स्त्रीच जबाबदार असते असे नाही किंवा सर्व दोष स्त्रियांच्याकडे असतात असे नाही तर स्त्रिला अनिष्ट मार्गाला लावणारे स्त्रिला बदनाम करणारे पुरूषच असतात. टाळी केवळ एकाच हाताने वाजत नाही पण त्यातल्या उजव्या हाताचा जोर जास्त असतो असे त्या स्पष्टपणे सांगता सांगता अनेक प्रकारचे दाखले देवून सिध्द केलेले आहेत.

ताराबाईंची बहुश्रृतता त्यांची स्पष्ट व भारदस्त भाषा, तसेच पुरूषानी स्त्रियांवर केलेले आक्षेप क्रमवार खोडून काढताना पुरूषाना केलेले समर्पक सवाल, त्यासाठी वापरलेले वाक्यप्रचार म्हणी त्यांची भाषा या मधून त्यांच्या व्यक्तिमत्वाची छाप पाडून जाते.

पुरूषप्रधान संस्कृतिचा पगडा असतानाही ताराबाई मार्मिकपणे पुरूषांच्या दुर्गुणावर आपल्या लेखनीने ताशेरे ओढतात. स्त्री व पुरूष ही संसाराची दोन चाके असताना पुरूषानी

केवळ स्वामित्वाच्या भूमिकेतून स्त्रियाना तुच्छ लेखू नये तर त्यानाही प्रतिष्ठा मान सन्मान प्राप्त करून दिला पाहिजे. दोघानाही समानतेची वागणून मिळाली पाहिजे हा त्यांचा सूर आहे.

*****

## संदर्भ ग्रंथ

१) जोगळेकर मृणालिनी – "स्त्री मुक्तीच्या" उद्गात्या सुमन बेहरे, पुणे - स्वाती प्रकाशन, पथमावृत्ती, ऑगष्ट १९९८, पृ.क्र. ३६.

२) तत्रैव, पृ.क्र. ३६.

३) तत्रैव, पृ.क्र. ३७.

४) शिंदे ताराबाई - "स्त्रीपुरूष तुलना मूलसंहिता", पुणे श्री शिवाजी छापखाना, प्रकाशक - विलास खोले, प्र.आ. १८८२, पृ.क्र. २९ आणि ३०.

५) Rai B.C. History of Indian Education Commission No. 2. The First Indian Education Commisstion or Hunter Commission 1882, Page No. 205.

६) कुलकर्णी, गो.म. - "वाटा आणि वळणे", नवसाहित्य प्रकाशन, बेळगांव, प्र.आ., पृ.क्र. १९.

७) खोले विलास – " स्त्रीपुरूष तुलना", ताराबाई शिंदे लिखित, संपादक - प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १५ ऑगष्ट १९४७, पृ.क्र. १७.

८) मिसेस फरार – "कुटुंबप्रवर्तन नीति", १८३५, पृ.क्र. ३०, ३२.
"स्त्रीपुरूष तुलना", ताराबाई शिंदे लिखित, संपादक - प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १५ ऑगष्ट १९४७, पृ.क्र. १८.

९) "ज्ञानोदय" अंक - १५ फेब्रुवारी, १८५५ पूर्वार्ध, १ मार्च, १८५५ उत्तरार्ध.
संदर्भ - "स्त्रीपुरूष तुलना", ताराबाई शिंदे लिखित, संपादक - प्रतिमा प्रकाशन, पुणे,

१०) "बॅ. रामराव देशमुख यांचे १२-४-७५ चे पत्र". प्रकाशक मालसे स.ग. – ताराबाई शिंदे लिखित "स्त्रीपुरूष तुलना", प.आ. १९७५, प्रस्तावना पृ.क्र. २.

११) तत्रैव, पृ.क्र. ३.

१२) जोगळेकर मृणालिनी – "स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा", पॉप्युलर प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९१, पृ.क्र. ३०.

१३) डॉ. मालशे स.गं. – "स्त्रीपुरूष तुलना", ताराबाई शिंदे लिखित, प्र.आ. १९७५, मुंबई प्रस्तावना, पृ.क्र. २.

१४) "स्त्री दास्याचा प्रश्न आणि सत्यशोधक विद्युत भागवत" – सकाळ दि. २४.९.८८. संदर्भ - "स्त्री अस्मितेचा आविष्कार एकोणिसावे शतक" - मृणालिनी जोगळेकर.

१५) "लोकहितवादींची शतपत्रे - एका पत्राचा उल्लेख", संदर्भ - "स्त्री अस्मितेचा आविष्कार एकोणिसावे शतक" - मृणालिनी जोगळेकर. भाग ३ ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे, पॉप्युलर प्रकाशन, १९९१,

१६) तत्रैव, पृ.क्र. ३५.

१७) डॉ. कोत्तापल्ले नागनाथ – संपादक - "स्त्रीपुरूष तुलना", ताराबाई शिंदे कैलाश पब्लिकेशन, औरंगपुर, औरंगाबाद, प्र.आ. २९, मार्च, १९९०, प्रस्तावना पृ.क्र. १०.

१८) खोले विलास – "स्त्रीपुरूष तुलना", ताराबाई शिंदे लिखित, संपादक - प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १५ ऑगष्ट १९४७, प्रस्तावना, पृ.क्र. ४६, ४७.

१९) तत्रैव, प्रस्तावना, पृ. क्र. ४७.

२०) जोगळेकर मृणालिनी – "स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा" – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९३, भाग-३, ताराबाई शिंदे, पृ.क्र. ८.

२१) रानडे रमाबाई - "आमच्या आयुष्यातील आठवणी", प्रथम आवृत्ती पृ.क्र. ४१-४२.

२२) शिंदे ताराबाई - मूळसंहिता – "स्त्रीपुरूष तुलना" , श्री शिवाजी छापखाना सन १८८२, पृ.क्र.

२३) डॉ. मालशे सं.ग. – "स्त्रीपुरूष तुलना" ताराबाई शिंदे लिखित, दु.आ. १९७५, मुंबई, प्रस्तावना, पृ.क्र. ७.

२४) शिंदे ताराबाई - "स्त्रीपुरूष तुलना", मूळसंहिता, १८८२, श्री शिवाजी छापखाना, पुणे, प्र.आ., पृ.क्र. ४९.

२५) तत्रैव, पृ.क्र. ४१.

२६) डॉ. मालशे सं.ग. – "स्त्रीपुरूष तुलना" ताराबाई शिंदे लिखित, दु.आ. १९७५, मुंबई, प्रस्तावना, पृ.क्र. ९.

२७) तत्रैव, प्रस्तावना, प्र.क्र. १४.

२८) जोगळेकर मुणालिनी – "स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा" – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९३, भाग-३, ताराबाई शिंदे, पृ.क्र. ३८.

२९) डॉ. मालशे सं.ग. – "स्त्रीपुरूष तुलना" ताराबाई शिंदे लिखित, दु.आ. १९७५, मुंबई, प्रस्तावना, पृ.क्र. १.

३०) खोले विलास – "स्त्रीपुरूष तुलना", ताराबाई शिंदे लिखित, संपादक - प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १५ ऑगष्ट १९४७, प्रस्तावना, पृ.क्र. ६५, ६६.

३१) "लोकहितवादींची शतपत्रे - एका पत्राचा उल्लेख", संदर्भ - "स्त्री अस्मितेचा आविष्कार एकोणिसावे शतक" - मृणालिनी जोगळेकर. भाग ३ ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे, पॉप्युलर प्रकाशन, १९९१, पृ.क्र. ४०, ४१.

३२) तत्रैव, ४२.